| MHKO160002782023 | रे.क.नं.३८/२०२३ मधील नि.२० खालील आदेश |
|---|---|

१. वादींनी सदरचा अर्ज पोलीस बंदोबसत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे, त्यामध्ये त्यांनी कथन केले की, प्रतिवादीं यांनी वादींच्या खरेदीनुसार मालकीवहिवाटीच्या दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून दावा मिळकतीच्या हद्दीवरील सिमेंट पोल काढून टाकले आहेत व दावा मिळकतीतील क्षेत्र ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. या दाव्यात प्रतिवादींविरूध्द तूर्तातूर्त मनाईचा आदेश् झालेला आहे. सदरचा मनाई आदेश झाल्यानंतर वादींनी दावा मिळकतीच्या हद्दींवर कंपाउंड बांधकाम करण्याचे ठरविले असून त्याकरीता बाहेरील खोदकामाकरीता मजुरांना पाठविले असता प्रतिवादींनी मजुरांना शिवीगाळ केली व तेथे बांधकाम केलेस जीवे मारणेची धमकी दिली. सबब, वादीं दावा मिळकतीच्या हद्दीवर कंपाउंडचे बांधकाम करीत असताना प्रतिवादीं यांनी वादींना पुन्हा हरकत व अडथळा करणार याची खात्री झाली आहे. त्यामुळे प्रतिवादींचे दुष्कृत्य रोखण्यासाठी वादींनी पोलीस बंदोबस्त मिळण्याची सदर अर्जाद्वारे मागणी केली आहे.

२. प्रतिवादीं यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे व कथन केले की त्यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केलेला नाही. तसेच नि.५ वरील आदेशाचे त्यांनी उल्लंघन केलेले नाही. तसेच नि.५ वरील आदेशाविरूध्द त्यांनी मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापुर येथे अपील दाखल केले आहे. प्रतिवादीं यांनी दावा मिळकतीत कोणतीही नासधुस केलेली नाही व मजुरांना शिवीगाळ केलेली नाही, तसेच जीवे मारण्याची धमकी दिलेली नाही. प्रतिवादींचा गरीब स्वभावाचा फायदा घेऊन न्यायालयाची दिशाभूल करून सदरचा अर्ज वादींनी दाखल केलेला असून तो नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

३. वादींवा अर्ज व प्रतिवादींचे म्हणण्याचे, तसेच दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले, दोन्ही बाजूंचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. या न्यायालयाने वादींचा नि.५ वरील मनाईचा अर्ज यापूर्वी मंजूर केलेला असून प्रतिवादीं यांनी वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करून नये असा प्रतिवादीविरूध्द तात्पुरता मनाईचा आदेश पारीत केलेला

आहे. त्यानंतर वादीं यांनी दावा मिळकतीच्या हद्दीवर कंपाऊंडचे बांधकाम करण्याचे ठरविले व त्याकरीता चर खोदण्यास गेलेल्या मजुरांना प्रतिवादींनी शिवीगाळ करून कंपाउंडचे बांधकाम करण्यास मज्जाव केलेला आहे. यावरून असे दिसते की प्रतिवादीं हे वादींच्या कब्जेवहिवाटीस व कंपाउंडचे बांधकाम करण्यास हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये कंपाउंडचे बांधकाम करण्यास वादींना पोलीस बंदोबस्त देणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे आदेश करणे न्यायोचित होणार आहे. त्याकरीता, खालीलप्रमाणे आदेश.

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाण २० हा मंजूर करण्यात येत आहे.

२. पो.नि., शाहूवाडी पो. ठाणे यांना असे आदेशित करण्यात येते की त्यांनी एक पुरूष व एक महिला पोलीस वादीं यांना सदरचे कंपाउंडचे बांधकाम करण्याकरीता पोलीस बंदोबस्तासाठी द्यावे.

३. वादींनी सदरचा पोलीस बंदोबस्ताचा खर्च संबंधित पो. ठाणेमध्ये जमा करावा.

**खुल्या न्यायालयात घोषित.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AMOL SHRIRAM SHINDE
Date: 2023.10.06 11:50:03 +0530

(अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
शाहुवाडी मलकापूर, जि. कोल्हापुर.

स्थळ- शाहुवाडी
दि.०४/१०/२०२३